# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
यांचेकार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्र-३३२/२०२४ दिनांक-२७/०८/२०२४.

## "गहाळ झालेले मोबाईल फोनचा तपास करुन एकुण ०३,६५,४००/- रुपये किंमतीचे २४ मोबाईल फोन नागरिकांना परत करण्यास विरार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश"

विरार पोलीस ठाणे हद्दीतील रहिवाशांचे मोबाईल फोन मिसिंग/गहाळ होण्याचे प्रमाण वाढले होते. त्याअनुषंगाने मा. वरिष्ठांनी गहाळ/मिसिंग झालेल्या मोबाईल फोनचा शोध घेणे बाबत सुचना दिल्या होत्या. मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी विरार पोलीस ठाणेच्या गहाळ/मिसींग मोबाईलचा तपास हाती घेतला होता.

विरार पोलीस ठाणे दाखल गहाळ/मिसींग मधील मोबाईल फोनचे बुध्दी कौशल्याने व तांत्रीक माहितीचे आधारे विश्लेषण करुन आपल्या भारत देशातील वेगवेगळया राज्यांमधुन तसेच महाराष्ट्र राज्यातील वेगवेगळया जिल्हयामधुन एकुण- ३,६५,४००/- रु. किंमतीचे वेगवेगळया कंपनीचे एकुण २४ मोबाईल फोनचा शोध घेऊन प्राप्त करण्यास गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आले आहे. सदर मोबाईल फोन नागरिकांना परत करण्यात आलेले आहेत.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त मि.भा.व.वि, श्री. दत्तात्रय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त मि.भा.व.वि, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-३, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे, श्री. सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पोउपनिरी/अविनाश हाटखिळे, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, पोअं/संदीप शेळके, मोहसीन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, प्रफुल सोनार व पोशि/उत्कर्ष सोनावणे तसेच पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३, विरार यांचे कार्यालयातील पो.हवा/नामदेव ढोणे व पो.अं/सोहेल शेख यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.







------------ooooo-----------